PAGE No. 31/3/2023.
DATE / /

# जीवनगाणे.

नको उद्याची चिंता नकोच गतकाळी रमणे।
दिवस आजचा सुरेख सुंदर मोद मानुनी जगणे॥
ईश्वराचे देणे जाण तू मनुष्यजन्म अनमोल।
ठेवील तेथे सुखी रहाणे समजूनी त्याचे मोल॥
नकोस ठेवू आस कशाची सोड हवे-नकोपण।
वाणीमध्ये असू दे गोडवा दुखवू नको कुणाचे मन॥
नको कुणाशी स्पर्धा, ईर्षा नको कुणाच्या द्वेष।
वृत्ती समाधानी जपू, नको अहंपणाचा लेश॥
नात्यांमध्ये नकोच गुंतणे, निर्णय कठोर वा हळवे।
देणे-घेणे हिशेब नको, मन निस्वार्थी हवे॥
अहंभाव-अभिमान सोडू या जन्म करू सार्थकी।
कुणा-कधीच कळले नाही आयुष्याची बाकी॥
नको निराशा, करू प्रयत्न संधीची पाहू वाट।
तिमिर सरुनी होईल उज्वल भविष्याची पहाट॥
फुलांमुलांशी करू या गट्टी घेऊ सृष्टीचा आनंद।
जीवन सुंदर गाणे असे जपू चांगला छंद॥
आळवावरचे पाणी असे हे जीवन तू जाण।
आनंद वाटू, आनंद लुटू गाऊन जीवनगान॥

सौ. सुनीता मो. मोडक
B3/2 शिवतारा गार्डन
डी. पी. रोड. कोथरुड.
मोबाइल — ९८५२५२७४१४.